# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २७/०३/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २७/०३/२०१५ रोजी सभा सुचना क्र. २१ दि. २३/०३/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रशांत एन. केळूसकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सभापती |
| २. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ३. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ४. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ५. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ६. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ७. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ९. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| १०. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| ११. | श्री. मोहन जाधव | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| २. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ३. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| ४. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सुप्रभात. सर्व सन्मा. सदस्यांना आजच्या दिवसाच्या शुभेच्छा. आजची सभा आपण खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडू अशी सर्वांकडून अपेक्षा. तसेच रामनवमीच्या सर्वांना शुभेच्छा. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २७/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात विशेष स्थायी समिती सभा सुचना क्र. २१, दि. २३/०३/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १७५, दि. २८/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

दि. २८/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १७५ :-**

दि. २८/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १६४ :-**

दि. २८/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून अनुसूचित "ड" कलम १ "के" नुसार अन्वये प्रस्ताव आला आहे. तो विषय घ्यायचा का?

**मा. सभापती :-**

हा विषय घ्या. २ तारखेला सण आहे महावीर जयंती म्हणून तो आपल्याला घ्यायला लागेल.

**सुहास रकवी :-**

विषयाचे वाचन करा.

**नगरसचिव :-**

सगळ्यांना गोषवारा देतो.

**सुहास रकवी :-**

महावीर जयंतीचा विषय आहे तर घ्यायलाच लागेल.

**नयना वसाणी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सर्वधर्मीय उत्सवातंर्गत विविध सण व कार्यक्रमातंर्गत विविध व्यवस्था करणे कामी दरवर्षी निविदा वार्षीक दर मागवुन कंत्राटदार निश्चित करण्यात येतो. सन २०१३-१४ या वर्षाकरीता मा.महासभेने या बाबत मा. महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अन्वये ठराव पारीत केला आहे. तथापी सदर ठरावात दरवर्षीपेक्षा जास्त सणांचा समावेश ठरावात केल्याने व अटीशर्ती बाबत मा. महासभा दि.२३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अन्वये निर्णय घेतल्याने मा.महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अशंतः विखंडीत करण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडील दि.०१/०९/२०१४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे. मा. महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अन्वये प्राप्त प्रशासकिय व आर्थिक मान्यतेनुसार सालाबादाप्रमाणे ठेवण्यात येणाऱ्या अटीशर्ती ठेऊन प्रशासनाच्या मुळ प्रस्तावित कामांसाठी निविदा मागविण्यात आल्या. तथापी दोन वेळा निविदा प्रसिध्द करुन व निविदांना वेळोवेळी मुदतवाढ देऊन देखिल सदर कामांसाठी पुरेशा निविदा प्राप्त होत शकल्या नाहीत. त्यामुळे सदर निविदा मागविलेल्या मुळ अटीशर्तीत बदल करुन तसेच इतर महानगरपालिकेमार्फत अशा प्रकारच्या कामांसाठी मागविण्यात येणाऱ्या निविदातील अटीशर्ती बाबतची माहिती घेऊन तदनंतर निविदा मध्ये अटीशर्ती ठेऊन निविदा मागविल्यास पुरेशा निविदा प्राप्त होऊ शकतील. त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. प्रस्तावित कामासाठी यापुर्वी मागविण्यात आलेल्या कंत्राटदाराची मुदत ही दि. २७/०८/२०१४ रोजी संपलेली आहे. त्यामुळे सद्यास्थितीत सदर कामाचे कंत्राटदार मे.धारावी डोकोटरेटर्स यांना नव्याने अटीशर्ती ठरवून निविदा मागवुन कार्यादेश देईपर्यत ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**नरेश पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सव व विविध कार्यक्रमासाठी मंडप, लाईट, स्टेज, टेबल, खुर्ची, पार्टीशन, स्पीकर सेट, जनरेटर, रेलिंग इ. व्यवस्था करणेकामाच्या निविदेस मुदतवाढ देणे बाबत.

**ठराव क्र. १६५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सर्वधर्मीय उत्सवातंर्गत विविध सण व कार्यक्रमातंर्गत विविध व्यवस्था करणे कामी दरवर्षी निविदा वार्षीक दर मागवुन कंत्राटदार निश्चित करण्यात येतो. सन २०१३-१४ या वर्षाकरीता मा. महासभेने या बाबत मा. महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अन्वये ठराव पारीत केला आहे. तथापी सदर ठरावात दरवर्षीपेक्षा जास्त सणांचा समावेश ठरावात केल्याने व अटीशर्ती बाबत मा. महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अन्वये निर्णय घेतल्याने मा.महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अशंतः विखंडीत करण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडील दि. ०१/०९/२०१४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात

आला आहे. मा. महासभा दि. २३/०६/२०१४ ठराव क्र. ०६ अन्वये प्राप्त प्रशासकिय व आर्थिक मान्यतेनुसार सालाबादाप्रमाणे ठेवण्यात येणाऱ्या अटीशर्ती ठेऊन प्रशासनाच्या मुळ प्रस्तावित कामांसाठी निविदा मागविण्यात आल्या. तथापी दोन वेळा निविदा प्रसिध्द करुन व निविदांना वेळोवेळी मुदतवाढ देऊन देखिल सदर कामांसाठी पुरेशा निविदा प्राप्त होत शकल्या नाहीत. त्यामुळे सदर निविदा मागविलेल्या मुळ अटीशर्तीत बदल करुन तसेच इतर महानगरपालिकेमार्फत अशा प्रकारच्या कामांसाठी मागविण्यात येणाऱ्या निविदातील अटीशर्ती बाबतची माहिती घेऊन तदनंतर निविदा मध्ये अटीशर्ती ठेऊन निविदा मागविल्यास पुरेशा निविदा प्राप्त होऊ शकतील. त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. प्रस्तावित कामासाठी यापुर्वी मागविण्यात आलेल्या कंत्राटदाराची मुदत ही दि. २७/०८/२०१४ रोजी संपलेली आहे. त्यामुळे सद्यास्थितीत सदर कामाचे कंत्राटदार मे. धारावी डोकोटरेटर्स यांना नव्याने अटीशर्ती ठरवून निविदा मागवुन कार्यादेश देईपर्यत ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी** **अनुमोदक :- श्री. नरेश पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मोहन जाधव :-**

मा. सभापती साहेब माझ्या प्रभागात आज शेवटची सभा आहे.

**मा. सभापती :-**

माझ्या प्रभागात देखील आज शेवटची सभा आहे. माझे सर्वांना निवेदन आहे आजची सभा तहकूब करुया. आजची सभा दि. ३१ पर्यंत तहकूब करत आहे. वेळ ११.०० वाजता.

**(सभा तहकुब वेळ सकाळी ११.२० वाजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

